दै. महाराष्ट्र टाईम्स, पुणे
मंगळवार दि. २९ मे २०१८

शिवरायांनी स्थापन केलेले आरमार



आपली आरमारी परंपरा संपुष्टात आल्यावर त्याचा युरोपियनांनी फायदा घेतला आणि संपूर्ण सागरी किनारपट्टी आणि समुद्री व्यापार त्यांच्या ताब्यात गेला. मित्रांनो, या पार्श्वभूमीवर आपले मराठी आरमार कसे उभे राहिले ते पाहू या. छत्रपती शिवाजी महाराजांनी इसवी सन १६५६ मध्ये जावळी प्रांत घेतला. जावळीचा काही भाग कोकणात असल्यामुळे राजांचा कोकणात प्रवेश झाला. या मुलखातल्या लोकांना जंजिऱ्यातील सिद्दीकडून होणाऱ्या अन्यायाच्या असंख्य तक्रारी महाराजांच्या कानी आल्या. त्यामुळे मराठी सैन्याच्या सिद्दीशी झटापटी सुरू झाल्या. सिद्दीकडे प्रबळ आरमार असल्यामुळे; तसेच वेळोवेळी पोर्तुगीज, इंग्रज, आदिलशहा आणि मुघल हे सिद्दीला मदत करत असल्यामुळे त्याच्यावर अंकुश ठेवणे शक्य होत नव्हते. सिद्दी हा समुद्री डाकू ठरला होता. सिद्दीचे सैनिक मराठ्यांच्या ताब्यातली गावे लुटून जाळपोळ करीत असत. आपले सैन्य येत असल्याचे पाहून सिद्दीचे लोक नावेत बसून जंजिरा किल्ल्यात पळून जात असत. सिद्दीला आपण जमिनीवर मात देऊ शकतो; समुद्रात नाही, हे महाराजांच्या लक्षात आले. सिद्दीची आर्थिक नाकेबंदी आणि रसद तोडावी म्हटलं, तर त्याला ती समुद्रामार्गे आपल्याच शत्रूंकडून पुरवली जाई. बखरीत याचे वर्णन आहे.. 'घरात जैसा उंदीर तैसा जंजिऱ्यात लपून बसलेला राजापुरीचा सिद्दी, यास कैसे जेर करावे,' असा विचार करून महाराजांनी आरमार अवश्यमेव करण्याचे, पाणियातील म्हणजे केवळ जंजिरे असे करून जहाजे मेळवून दर्यास पालाण घालण्याचे राजांनी ठरविले.

अखेर तो दिवस उजाडला. २४ ऑक्टोबर १६५७ रोजी



ऐन दिवाळीत मराठ्यांनी कल्याण, भिवंडी काबीज केली. या नव्या मुलखाच्या संरक्षणासाठी आणि सिद्दीच्या कुरापती थांबवण्यासाठी, तसेच त्याला समुद्रामार्गे मिळणारी रसद तोडण्यासाठी नाविक दल (लढाऊ आरमार) असणे गरजेचे होते. त्यासाठी योग्य जागा हवी होती. समुद्रातून आत घुसलेली खाडी ही जहाजबांधणीसाठी उत्तम जागा असते. कल्याणच्या या खाडीत मराठ्यांच्या पहिल्या जहाजाची निर्मिती झाली. यंदा या घटनेला ३६१ वर्षं पूर्ण होत आहेत. ही आपल्यासाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे. म्हणूनच या दिवसाची स्मृती चिरंतन राहावी, म्हणून हा दिवस 'मराठा आरमार दिन' म्हणून साजरा केला जातो. मराठ्यांच्या जहाज बांधणीच्या या गोदीच्या संरक्षणासाठी महाराजांनी कल्याणच्या खाडीजवळ असणाऱ्या टेकाडावर दुर्गाडीचा किल्ला बांधला. केवळ सिद्दीशी मुकाबला करण्यासाठी आणि परकीयांच्या सत्तापिपासू वृत्तीला लगाम घालण्यासाठी राजांनी अत्यंत चलाखीने आणि धूर्तपणे आरमाराची उभारणी केली.

परंपरा आरमाराची
भाग ५
अनिकेत यादव